Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# शाश्वत विकासाची उद्धिष्टे साध्य करताना महिलांच्या भूमिकेचा अभ्यास

**प्राचार्या डॉ समीना इफ्तेखार नदाफ**
मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला
शिक्षणशास्त्र महाविद्यालय जुळे सोलापूर

**प्रास्ताविक**

जून २०१२ मध्ये पार पडलेल्या रिओ – 20 परिषदेनंतर जुलै २०१४ मध्ये १७ कलमी शाश्वत विकासाची उद्धीष्टांची निर्मिती करण्यात आली. शाश्वत विकासाशी संबधित आर्थिक विकास सामाजिक विकास व पर्यावरण संरक्षण आदि मुद्द्यावर यामध्ये भर देण्यात आला आहे. २५ सप्टेंबर २०१५ ला पार पडलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास परिषदेच्या शेवटी जगभरातील नेत्यांनी २०३० पर्यंत शाश्वत विकासाचा अजेंडा स्वीकारला

**शीर्षक** –

शाश्वत विकासाची उद्धिष्टे साध्य करताना महिलांच्या भूमिकेचा अभ्यास

**उद्धिष्टे** –

१) शाश्वत विकासाच्या उद्धिष्टाचा अभ्यास करणे.

२) शाश्वत विकासाची उद्धिष्टे साध्य करताना महिला पुढील आव्हानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा-**

या शोध निबंधासाठी सोलापूर शहरातील एकाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा विचार केला. मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि प्रध्यापिकांचाच फक्त विचार केला आहे.

**संशोधनाची गरज व महत्व :-**

या संशोधनात शाश्वत विकासाच्या उद्दिष्टामध्ये स्त्रियांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्त्री पुरुष समानता महिलांचे आरोग्य आणि कालमान, योग्यकाम आणि आर्थिकवाढ, शांतता, न्याय मजबूत शासन संस्था. या संशोधनामुळे स्त्रियांना त्यांच्या हक्काची न्यायाची जाणीव होण्यास मदत होईल.

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करताना महिलांना कोणकोणता आव्हानाचा सामना करावे लागल हि जाणीव होण्यास मदत होईल. त्याच्यापुढे शिक्षणातील आव्हाने, लिंग वेतन अंतर हिंसा आणि लिंग आधारित भेदभाव, निर्णय घेण्यामध्ये पुढाकाराचा अभाव, पुनरुत्पादक अधिकार आणि आरोग्य सुविधा, मालमत्ता अधिकार, रूढीवाद आणि सामाजिक नियम इ. आव्हानांची जाणीव होण्यास मदत होईल.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत आहे. त्यामुळे सर्वेक्षण पद्धती वापरली आहे .

**साधने** :- प्रश्नावली, मुलाखत

**नमुना निवड** –

एकूण महाविद्यालयामधील १०० प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनी आणि ५ महिला प्राध्यापक यांची निवड केली.

**कार्यपद्धती :-**

निवडलेल्या १०५ महिलांना प्रश्नावली दिली व भरून घेतली. त्यानंतर १०५ मधील ५० विद्यार्थिनी आणि महिला प्राध्यापक याची लॉटरी पद्धतीने निवड करून गट मुलाखत घेतले.

**माहिती विश्लेषण व अर्थ निर्वाचन :-**

| अ.क्र. | विवरण | होय | % | नाही | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरामध्ये योग्य स्थान | १०० | १०० % | ५ | ५ % |
| २ | घरात भावाच्या बरोबरीने वागतात | ८० | ८४ % | २५ | २० % |
| ३ | घरात त्रासदायक बोलतात | ८६ | ९६.३ % | १९ | १९.५ % |
| ४ | भावाच्या | ८६ | ९६.३ % | १९ | १९.५ % |

VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बरोबरीने पोषण आहार | | | | |
| ५ | जास्त फी च्या कोर्सेसला घालतात | ८० | ८४ % | २५ | २६ % |
| ६ | भावाऐवजी तुम्हाला प्राधान्य | १० | १०.५ % | ९५ | ९९.७५ % |
| ७ | निर्णय घेण्यामध्ये सहभाग | ८५ | ८९.२५% | २० | २१ % |
| ८ | तुमच्या निर्णयाला घरात मान्य करतात | ४५ | ४१.५ % | ६० | ६३.२५ % |
| ९ | हुंडा दिला आहे / मत विचारतात | ९० | ९४.५% | १५ | २६.२५ % |
| १० | पुनरुत्पादक अधिकार आरोग्य सुविधा | ७० | ७३.५ % | ३५ | ३६.७ % |
| ११ | प्रसूती सुविधा कायदा माहिती | ७५ | ७८.७५ % | ३० | ३१.५ % |
| १२ | मातृत्व संरक्षण माहिती | ५० | ५२.५ % | ५५ | ५२.५ % |
| १३ | विविध कार्यक्रमात संधी | ६० | ६३ % | ४५ | ४१.५ % |
| १४ | विविध खेळात संधी | ७० | ७३.५ % | ३५ | ३६.७ % |
| १५ | महिला छेडछाड कायदा अंमलबजावणी | ५० | ५२.५ % | ५५ | ३६.७ % |
| १६ | आर्थिक स्वांतंत्र्य | ५५ | ५७.५ % | ५० | ५२ % |
| १७ | संपत्ती मध्ये समान अधिकार | ४५ | ४१.०५% | ६० | ६३ % |
| १८ | रूढीवादी आणि सामाजिक नियम | ८८ | ८३ % | १५ | २६.२५ % |
| १९ | महिला बचत गट सदस्य | ४५ | ४१.५ % | ६० | ६३ % |
| २० | घरातील घटकांचा वापर अति ( पाणी, उर्जा, अन्न ) | ८० | ८४ % | २५ | २६ % |
| २१ | सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग ( अन्न सुरक्षा, पोषण आहार,पर्यावरण दिन, वृक्षसंवर्धन) | ५० | ५२.५ % | ५५ | ५७ % |
| २२ | शाश्वत विकासामध्ये सहभाग(आवश्यक तेथेच उर्जा वापर ) कमीत कमी घटकाचा वापर | ५० | ५२.५ % | ५५ | ५७ % |
| २३ | अल्पखर्चिक उर्जा साधनाचा वापर. ( फ्रीज, मिक्सर, ए.सी. कमीतकमी उपयोग ) | ६० | ६३ % | ४५ | ४१.५ % |
| २४ | घरातील टाकाऊ वस्तूचा पुनर्वापर | ७० | ७३.५ % | ३५ | ४१.५ % |
| २५ | पाण्याचा पुनर्वापर (किचन, बागकाम) | ५५ | ५७ % | ५० | ५२.५ % |
| २६ | पर्यायी उर्जा स्त्रोताचा वापर ( सोलार उर्जा, गोबरगॅस, इलेक्ट्रिक बाईक इ. ) | ४५ | ४१.५ % | ६० | ६३ % |

वरील विवरणावरून १०० % महिलांना घरामध्ये स्थान आहे असे दिसून येते. ८४ % महिलांना खर्चिक कोर्सेसला घालतात पुनरुत्पादक अधिकार आणि आरोग्य सुविधा ७३.५ % महिलाना माहित आहेत. प्रसूती सुविधा कायदा माहिती असलेला ७८.७५ % मातृत्व संरक्षण माहिती असलेल्या महिला ५२.५ % निर्णयामध्ये सहभाग दर्शविणाऱ्या महिला ८९.२५ % पण त्याचे निर्णय घरात मान्य करतात असे उत्तर देणाऱ्या महिला ४१.५ % आहेत.

'स्त्री पुरुष समानता' त्या उद्दिष्टांची अंमबजावणी होत नाही असे मत नोंदविले. महिलांना घरभर जाण्याचे स्वातंत्र्य असावे, जरब स्वतः चा विकास व कुटुंबाच्या विकासासाठी गरजेचे आहे असे वाटते.

स्त्री भृणहत्या विषयी मते नोंदविताना बहुतांश महिलांना असे वाटते कि स्त्रीभ्रूणहत्या थांबली पाहजे कारण मुलींची संख्या कमी होत आहे नैसर्गिक समतोल ढासळत आहे. त्याच बरोबर मुलगी असणे अभिमानाची गोष्ट आहे, असे मत नोंदविले आहे.

महिला महणून नोकरीच्या ठिकाणी बहुतेक महिलांना पुरुषाचे वर्चस्व, पुरुषापेक्षा जास्त काम, कामात असहकार, रजा लगेच देत नाहीत, इ. अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

कुटुंब नियोजानाबबातीत बहुतांश महिलांना वाटते कि कुटुंब नियोजन करावे कारण लहान कुटुंब, सुखी कुटुंब त्यच बरोबर मर्यादित मुलाची संख्या असल्यास सर्वच विकास होण्यास मदत होते.

**निष्कर्ष —**

१) स्त्री पुरुष समानता या उद्दिष्टाविषयी महिलांना असे वाटते कि म्हणावे तेवढे याचे समाजामध्ये प्रबोधन झाले नाही पुरुषप्रधान समाज आहे असे त्याचे मत आहे.

२) प्रसूती सुविधा अधिकार, आरोग्यविषयक उद्दिष्टाची ७० % महिलांना माहित आहे तर ३६.७ % महिलांना माहित नाही.

३) महिला छेडछाड कायद्याची अंमलबजावणी ५२.५ % महिलांना होते असे वाटते ५५ % महिला होत नाही.

४) रूढीवाद आणि सामाजिक नियम बद्दल ८३ % महिला आहे असे मत नोंदवितात तर १५ % महिला समाज रूढीवादी नाही असे म्हणतात.

५) संपत्तीमध्ये समान अधिकार याबद्दल ४१.५ % महिला आहे असे मत नोंदवितात तर ६० % महिला नाही.

६) घरातील रोजच्या वापरातील उर्जा स्त्रोत अतिवापर ८४ % महिला करतात २५ % अतिवापर करत नाही.

७) अन्नसुरक्षा, पोषण आहार, रानभाजी प्रदर्शन, पर्यावरण दिन, वृक्ष संवर्धन अशा उपक्रमामध्ये ५० % महिला सहभाग नोंदवितात ५७ % महिला नाही.

८) घरात अल्पखर्चिक उर्जा स्त्रोताचा वापर ६० % महिला करतात तर ४१.५ % नाही.

९) घरातील टाकाऊ वस्तूचा पुनर्वापर ७३.५ % महिलांचा प्रतिसाद होय असा आहे.

१०) पाण्याचा पुनर्वापर परसबागेतील झाडांना पाणी घालून फक्त ५७.७ % महिला करतात.

११) पर्यायी उर्जा स्त्रोताचा वापर ४१.५ % महिलांच्या घरात होतो तर ६३ % महिला करत नाहीत.

**शिफारशी :-**

वरील निष्कर्षावरून खालील शिफारशी सुचविलेल्या आहेत.

१) महिला सबलीकरण व सशक्तीकरण सर्व क्षेत्रात योग्यरीत्या अंमलबजावणी झाली पाहिजे.

२) स्त्री पुरुष समानता या विषयी समाजामध्ये जाणीव जागृती केली पाहिजे व त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

३) प्रसूती सुविधा कायदा, मातृत्व संरक्षण कायदा, महिला छेडछाड कायदा स्त्री भृणहत्या कायदा इ. महिलांना माहिती होण्यासाठी खास कार्यक्रमांचे आयोजन शासनाने करावे.

४) महिलांना आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होण्यासाठी त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, लघु उद्योग प्रशिक्षण याचे आयोजन शासनाने मोठ्याप्रमाणावर करावे.

५) शासनाने महिला सबलीकरणासाठी असलेल्या सर्व योजना, दूरदर्शन, वृत्तपत्रे, प्रसार माध्यम इ. मार्फत महिलांपर्यंत पोहचवावा.

६) सामाजिक उपक्रमात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

७) घरातील उर्जा साधनाचा जपून वापर करावा यासाठी प्रसार माध्यमे, शैक्षणिक उपक्रमातून महत्व सांगावे.

८) पाण्याचे पुनर्वापरासंबंधी जाणीव जागृती समाजामध्ये महिलानामध्ये केले पाहिजे.

९) पर्यायी उर्जा स्रोताचा वापर करावा यासाठी महिलांमध्ये प्रबोधनपर व्याख्यान, नाटक, पथनाट्य याचे आयोजन करून महत्त्व सांगावे त्यावर सबसिडी द्यावी जेणेकरून जाणीव जागृती होईल.

१०) महिलांना राजकारणात समावेश वाढविण्यासाठी विविध महिला मेळावे, महिला दिन, महिला प्रबोधन इ. राजकारणाविषयी माहिती स्त्रियांना द्यावी.

११) शासकीय नियमच खाजगी संस्थामध्ये लागू करावेत. विशेष महिलांसाठी सोयी उपलब्ध कराव्यात कामाच्या ठिकाणी पाळणाघर, येण्या जाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

१२) महिला बचत गट शासनानेच अधिक सक्षम करावेत.

**संदर्भ सूची**

१) योजना – मे २००७ दृष्टीक्षेपात ११ पंचवार्षिक योजना.

२) योजना – ऑक्टोंबर २००७ जेंडर बजेटिंग.

३) निशिकांत ठकार ओशो स्त्री आणि क्रांती साकेत प्रकाशन.

४) स्त्री आधार केंद्र शाखा सोलापुर स्त्रिया समान भागीदार.

५) The CTE Journal Jan-2006 July-2006

६) योजना फेब्रुवारी २०१० भारतातील आर्थिक क्षेत्र.

७) पर्यावरणाचा शाश्वत विकास – प्राचार्या डॉ समीना इफ्तेखार नदाफ.